# <u>१०० रुपये चा मुद्रांक वर खालील मजकूर लिहून</u>

# <u>प्रतीज्ञापत्र</u>

**<u>वि. कार्यकारी दंडाधिकारी साहेब ..........यांचे समक्ष</u>**

## <u>प्रतिज्ञापत्र</u>

**<u>जिल्हा सेतू समिती तथा जिल्हाधिकारी, नागपूर</u>**

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय , नागपूर

**विषय** : आपले सरकार सेवा केंद्रा करिता असलेल्या अटी व शर्ती बाबत

महोदय,

मी **(संपूर्ण नाव)** वय ( ) वर्षे सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की, मी मौझा **(रहिवासी पत्ता)** ता. नागपूर, जि.नागपूर. **आधार कार्ड क्रमांक :** **पॅन कार्ड क्रमांक:....**

आपले सरकार सेवा केंद्राचा संपूर्ण पत्ता : **मौझा .....** **ग्रामपंचायत...........** **तालुका ..........** **जिल्हा नागपूर पिन कोड**

घरचा(रहिवासी) संपूर्ण पत्ता - **सरकारी दवाखाना जवळ नागपूर ता. नागपूर, जि.नागपूर.**

१. महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या आपले सरकार सेवा केंद्रा बाबतचा दि. १९ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयाला अधीन राहून केंद्राची नियुक्ती व कार्यान्वयीत केले आहे. तसेच आयोजकांच्या शर्तीचे व अटीचे पालन करील.

२. ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय, निमशासकीय व खाजगी सेवा आपले सरकार सेवा केंद्रावर देण्यात यावे याकरिता शासन निर्णय अंतर्गत जिल्हा सेतू समिती तथा जिल्हाधिकारी, नागपूर मार्फत आपले सरकार सेवा केंद्र चालक म्हणून माझी निवड करण्यात आली आहे.

३. मला प्रत्येक महिन्यासाठी किमान १०० ट्रान्झेक्शन करणे बंधनकारक आहे, जेणेकरून माझे केंद्र सुरु असल्याचे निदर्शनास येईल.

४. मी घेतलेले आपले सरकार सेवा केंद्र कोणालाही कोणत्याही परिस्थितीत हस्तांतरण करणार नाही. शासनाने ठरवून दिलेल्या वेळापात्रानुसार केंद्र चालू ठेवणे, शासनाने ठरवून दिलेले दरपत्रक केंद्रावर प्रसिद्ध करणे, तसेच ठरवून दिलेले दर स्वीकारणे, दरापेक्षा अधिक शुल्काची आकारणी न करणे. शासनाने पुरविलेल्या आज्ञावली इत्यादीचे योग्य वापर, संरक्षण व जतन करणे मला बंधनकारक राहील. तसे न केल्यास माझेवर प्रशासकीय कार्यवाही करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल व त्याला मी स्वतः जबाबदार राहील.

५. आपले सरकार सेवा केंद्र हे केंद्राच्या मार्गदर्शक सुचना नुसार अधिसूचित ठिकाणी क्रम प्राप्त आहे. केंद्राचे ठिकाण व ग्रामपंचायत बदलण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास, गंभीर स्वरूपाचा चूक समजून केंद्र रद्द करण्यात आल्यास ते मला मान्य राहील.

६. आपले सरकार सेवा केंद्रांना शासनाचे तसेच जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत वेळोवेळी देण्यात येणारे निर्देशांचे पालन करेन तसेच उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचे वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करेन, तसेच त्यांनी केंद्र बाबत कोणताही मागितलेला अहवाल तात्काळ सादर करील.

७. शासन निर्णयानुसार ठरवून दिलेल्या सर्व सेवा आपले सरकार सेवा केंद्रातून देणे अनिवार्य राहील. या बाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल व चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल.

८. शासनाचे साहित्य प्राप्त झाल्यास त्याचे काटकसरीने वापर करून संरक्षण व जतन करील.

९. महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान महामंडळ यांनी नियुक्त केलेल्या तांत्रिक अधिकारी हे आपले सरकार सेवा केंद्राचे संपूर्ण चौकशी करू शकतील. तसेच त्यांना माहिती देणे मला बंधनकारक राहील.

१०.	सदर केंद्र मला स्वयं रोजगार म्हणून मिळाले असून मी माझे केंद्र सर्व शासकीय दिवस सुरु ठेवील (किमान २२ दिवस) सुरु राहील जे मला बंधनकारक आहे या बद्दल मला संपूर्ण माहिती आहे.

वरील दिलेली माहिती या द्वारे घोषित करतो की, माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळल्यास भारतीय दंड संहिता अन्वये किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन व माझे आपले सरकार सेवा केंद्र तात्काळ बंद करण्यात येईल, याची मला पूर्ण जाणीव आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी, यांचा निर्णय अंतिम राहील. तसेच शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देशांचे पालन करील. तसेच सर्व अटी व शर्ती मला मान्य राहील.

स्थळ :-		अर्जदाराची स्वाक्षरी व नाव

दिनांक :-

______________________________

**<u>सत्यशोधन</u>**

मी सत्य प्रतिज्ञेवर कळवितो की, वरील मजकूर हा माझे माहिती प्रमाणे लिहिला असून ते मी वाचला व त्यावर माझा भरवसा आहे. तो चुकीचा निघाल्यास मी भादवी कलम १९३/२, १९९, २०० अन्वये शिक्षेस पात्र राहील.

तहसील :		सही

दिनांक :-

______________________________